| | प्रेसनोट<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,<br>पुणे-४११००६ | |
|---|---|---|

जा.क्र./पोउआ/वाह/ ७६९४/२०२३ पुणे दिनांक -२३/१०/२०२३

पुणे शहरातील येरवडा वाहूतक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, येरवडा वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी काही पार्किंगचे निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत आहेत.

**येरवडा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

| अ क्र | बदामी चौक ते शास्त्रीनगर चौक मार्गावरील ठिकाण | करावयाची उपाययोजना |
|---|---|---|
| १. | बदामी चौक ते सुदामा भेळ सेंटर | रोडच्या दुतर्फा नो पार्किंग झोन |
| २. | सुदामा भेळ ते ईशान्य मॉल चौक | उत्तर बाजुस नो पार्किंग तर दक्षिण बाजुस पार्किंग |
| ३. | ईशान्य मॉल गेट ते शांतीरक्षक चौक | पी १ पी २ पार्किंग |
| ४. | शांतीरक्षक चौक ते कर्णे हॉस्पीटल | पी १ पी २ पार्किंग |
| ५. | कर्णे हॉस्पीटल कडुन हर्मेस हेरीटेज फेज २,३ सोसायटी इन गेटकडे जाताना | डाव्या बाजुस नो पार्किंग तर<br>उजव्या बाजुस ५० मीटर दुचाकी ५० मीटर चारचाकी वाहन समांतर पार्किंग |
| ६. | हर्मेस हेरीटेज फेज २,३ सोसायटी इन गेट ते शास्त्रीनगर चौक | रोडच्या दुतर्फा नो पार्किंग झोन |

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे ४११००६ यांचे कार्यालयात दिनांक – २४/१०/२०२३ ते दिनांक – ०७/११/२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**(विजयकुमार मगर)**
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर